**आकाशवाणी नागपूर**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार, दिनांक ३० एप्रिल २०२४**

**ठळक बातम्या**

- **काँग्रेस नेत्यांकडून फक्त गरिबी हटविण्याचा नारा, अंमलबजावणी मात्र नाही -पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची माढा-च्या प्रचार सभेत टीका.**
- **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंती निमित्त सर्वत्र अभिवादन.**
- **हज यात्रेसाठी यात्रेकरुंना आवश्यक सोई-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी दिले निर्देश.**
- **विदर्भात काही ठिकाणी उष्णतेची लाट तर काही ठिकाणी वादळी पर्जन्यमान.**

*****

**मोदी सभा**

काँग्रेसने देशात ग्रामपंचायतपासून संसदेपर्यंत राज्य होते. पण, त्यांनी सत्ता असतानाही ६० वर्षांत काही केले नाही. आपल्या सरकारनं दहा वर्षात करून ते करून दाखवलं. काँग्रेसचे पंतप्रधान आणि नेत्यांकडून फक्त गरिबी हटविण्याचा नारा देत होते. मात्र, ती हटविण्यासाठी काही करत नव्हते. आम्ही गेल्या दहा वर्षांत २५ कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढण्यात यश मिळवलं आहे. गरिबीतून बाहेर आलेल्या त्या लोकांचे पुण्यही याच मतदारांना जातं. त्यांनी आपल्याला मला सेवा करण्याची संधी दिली. जेव्हा देशात मजबूत सरकार असतं, तेव्हा वर्तमान काळाबरोबरच भविष्याकडे लक्ष देता येत असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. माढा लोकसभेचे महायुतीचे उमेदवार, रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचारार्थ मोदी आज माळशिरस इथ जाहीर सभा झाली. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार बबन शिंदे आमदार संजय शिंदे, आमदार जयकुमार गोरे आदी उपस्थित होते. त्यानंतर लातूर लोकसभा या अनुसूचित जातींसाठी राखीव असलेल्या लोकसभा मतदारसंघाचे भाजप उमेदवार, सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारार्थ, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज, लातूरमध्ये जाहीर सभा पार पडली. याप्रसंगी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणाची सुरुवात मराठीतून केली. दरवर्षी एक नवीन पंतप्रधान देऊन काँग्रेससह मित्र पक्ष हे देशाला अस्थिर करण्याची योजना आखत असून, नवीन कायदे आणून नागरिकांची संपत्ती लुटण्याचा घाट काँग्रेस घालत असल्याची घणाघाती टीका, यावेळी मोदींनी केली.

**पाचवा टप्पा**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. या टप्प्यात राज्यातल्या धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे आणि मुंबईतल्या, सहा मतदारसंघांचा समावेश असून, तीन मे पर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार आहेत. उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघातून, महायुतीचे उमेदवार पियुष गोयल यांनी अर्ज दाखल केला. उत्तर मध्य मुंबईतून, महाविकास आघाडीच्या उमेदवार वर्षा गायकवाड, ईशान्य मुंबईतून संजय पाटील, धुळे लोकसभा मतदारसंघातून शोभा बच्छाव तर कल्याण लोकसभा मतदारसंघातून, महाविकास आघाडीच्या वैशाली दरेकर, अर्ज दाखल करणार आहेत.

**चकमक**

छत्तीसगढ मधल्या नारायणपूर जिल्ह्यात जिल्हा राखीव दल, विशेष कृती दलासोबत झालेल्या चकमकीत, दोन महिला नक्षलवाद्यांसह, सात नक्षलवादी मारले गेले. अबूझ माडच्या जंगलात नक्षलवादी असल्याची माहिती मिळाल्यानंतर, जिल्हा राखीव दल आणि विशेष कृती दलानं शोधमोहिम सुरु केल्यानंतर ही चकमक झाली. या ठिकाणाहून एक, ए.के.४७ आणि मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा तसंच दारुगोळा जप्त करण्यात आला.

**नेट परीक्षा**

विद्यापीठ अनुदान आयोगानं राष्ट्रीय पात्रता चाचणी अर्थात नेट परीक्षा दोन दिवस पुढे ढकलली असून, आता ही परीक्षा पूर्वनियोजित, १६ जून ऐवजी, १८ जूनला होणार आहे. दरम्यान, राज्यात दहावी आणि बारावी परीक्षेचा निकाल, मे अखेर लागण्याची शक्यता असून, राज्य शिक्षण मंडळाकडून काल ही माहिती, देण्यात आली.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ११५वी जयंती, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ.मिलींद बारहाते आणि प्रभारी कुलसचिव, डॉ.मो.अतिक यांनी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचं पूजन आणि पुष्पार्पण करुन, विद्यापीठाच्यावतीनं अभिवादन केलं. महावितरणच्या काटोल मार्गवरील, 'विद्युत भवन' या कार्यालयात झालेल्या जयंती कार्यक्रमाच्यावेळी, महावितरणच्या नागपूर परिक्षेत्राचे प्रादेशिक संचालक, सुहास रंगारी आणि नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता, दिलीप दोडके यांनी, राष्ट्रसंत

तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून, अभिवादन केलं. “या भारतात बंधुभाव नित्य वसू दे, दे वरचि असा दे” अश्या अनेक स्फूर्ती गीताच्या माध्यमातून, देशाला एकात्मतेच्या सुत्रात बांधणारे, वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंती निमित्त नागपूर मनपाच्यावतीनं तुकडोजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन, विनम्र अभिवादन करण्यात आलं. या शिवाय विविध नागपूर विद्यापीठ, विविध संस्था संघटनांनी, तुकडोजी महाराजांना त्यांच्या जयंती निमित्त अभिवादन केलं.

**‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’**

लोकसभा निवडणुकीचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण जालना लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. सायंकाळी सव्वासात वाजता आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून हा कार्यक्रम, प्रसारित होईल.

**हज यात्रा**

हज यात्रेसाठी नागपूर येथून प्रस्थान करणाऱ्या यात्रेकरुंना, प्राधान्यानं आवश्यक सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी, विविध विभाग प्रमुखांना सोपविलेली जबाबदारी, वेळेत आणि चोखपणे पूर्ण करण्याचे निर्देश, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी आज दिलेत. विभागीय आयुक्त कार्यालयात बिदरी यांच्या अध्यक्षतेखाली, ‘हज यात्रा २०२४’ सुविधा संबंधी आढावा बैठक झाली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, सौम्या शर्मा आदी, विभागांचे अधिकारी उपस्थित होते. नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाहून, हज यात्रेसाठी २६ मे ते नऊ जून २०२४ दरम्यान, महाराष्ट्र, छत्तीसगड आणि मध्यप्रदेशातील हज यात्रेकरु, प्रस्थान करणार आहेत. तर एक ते २१ जुलै २०२४ दरम्यान यात्रेकरु हज यात्रेवरुन परतणार आहेत. या दरम्यान यात्रेकरुंची शहरातील 'हज हाऊस' इथ निवासाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

**नरभक्षक वाघ**

मागील काही महिन्यापासून बल्लारपूर वनपरिक्षेत्र हद्दीत, जंगल परिसरात, टी-८६-एम हा, नरभक्षक वाघानं धुमाकूळ घातला होता. या वाघाच्या हल्यात चार जणांचा बळी गेला होता. त्याला जेरबंद करण्यासाठी वनविभागाकडून, मागील अनेक दिवसापासून, शर्थीचे प्रयत्न सुरू होते. अश्यातच काल हा वाघ, वनात लावलेल्या

कॅमेरात दिसून आला. सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास वनविभागाच्या संपूर्ण टिमनं पशु वैद्यकीय अधिकारी, वन्य जीव उपचार केंद्र चंद्रपूर, डॉ.कुंदन पोडचलवार यांच्या मार्गदर्शनात, शूटर अविनाश फुलझेले यांनी, गनद्वारे डार्ट मारत त्याला जेरबंद केलं.

**हिट वेव+हवामान**

विदर्भात काही ठिकाणी उष्णतेची लाट असून, काही ठिकाणी वादळी पर्जन्यमान आहे. विदर्भात वर्धा वगळता सर्वत्र आज वादळी पर्जन्यमान राहणार असल्याचा अंदाज प्रादेशिक हवामान विभागानं व्यक्त केला आहे. त्यानुसार नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली इथं, हलक्या पावसाच्या सरी बरसू शकतात. पश्चिम विदर्भात अमरावती आणि यवतमाळ वगळता, सर्वत्र हवामान कोरडं राहणार आहे. दरम्यान आज विदर्भात सर्वाधिक तापमान वाशिम जिल्ह्यात ४३ अंश तर नागपुर इथ ४० अंश सेल्सियस इतकं नोंदविण्यात आलं. अत्यधिक उष्ण ठिकाणी लोकांनी उन्हापासून बचावाची काळजी घेण्याच्या सूचना, देण्यात आल्या आहेत.

**महाराष्ट्र दिन**

महाराष्ट्र राज्याचा, ६५वा स्थापना दिन उद्या म्हणजे एक मे २०२४ रोजी राज्यभर साजरा होत असून, नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यांच्या मुख्यालय स्थळी, सकाळी आठ वाजता पालकमंत्री, जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते, मुख्य शासकीय ध्वजारोहण होणार आहे. नागपुरचा मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, कस्तुरचंद पार्क इथ होणार असून, यादिनानिमित्त नागपूरच्या दक्षिण-मध्य सांस्कृतिक केंद्रात पोवाडा गायन आणि कथ्थक नृत्य सादर केल जाणार आहे.

**आठवडी बाजार रद्द**

रावेर लोकसभा मतदारसंघासाठी तेरा मे रोजी, मतदान घेण्यात येणार आहे. या लोकसभा मतदारसंघात, बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा क्षेत्रातील, मलकापूर आणि नांदुरा तालुक्यांचा समावेश आहे. या तालुका मतदान होणार असल्यानं येत्या तारे मे चा आठवडी बाजार रद्द करण्यात आला आहे.

**महावितरण**

महावितरणच्या नागपूर परिमंडलातील वीजग्राहकांना एप्रिल अथवा मे महिन्यात, वीजबिलांसोबत अतिरिक्त सुरक्षा ठेव भरण्यासाठी स्वतंत्र बिल देण्यात येत आहे.

ही अतिरिक्त सुरक्षा ठेव नियमानुसार असून, त्याचा वीज ग्राहकांनी भरणा करावा असं आवाहन, महावितरणनं केलं आहे. लघुदाब वीजग्राहकांना अतिरिक्त सुरक्षा ठेवीची रक्कम घरबसल्या भरण्यासाठी, महावितरणच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर आणि मोबाईल ॲपवर हि सुविधा उपलब्ध आहे. वीजग्राहकांनी अतिरिक्त सुरक्षा ठेवीच्या बिलाची रक्कम भरून, सहकार्य करावं असं आवाहन महावितरणनं केलं आहे.

**आरोग्य विषयक आढावा**

डॉ.गवई, सहाय्यक संचालक मेडीकल नागपुर यांनी, गोंदिया जिल्हयात भेट देवुन आरोग्य विषयक कामाचा आढावा घेतला. त्यानंतर डॉ.गवई यांनी, गोरेगाव तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय इथ भेट देवुन, आरोग्य संस्थेव्दारे देण्यात येणाऱ्या आरोग्य सेवेची प्रत्यक्ष पाहणी केली. पंतप्रधान टी.बी. मुक्त भारत अभियान, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, बाल सुरक्षा कार्यक्रम इत्यादी विविध बाबींचा आढावा घेवुन, मार्गदर्शक सुचना त्यांनी यावेळी दिल्यात.

****